## निशाणी क्र.४१ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी मुळ दाव्यास कैफियत देण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

२. आपल्या अर्जातून प्रतिवादी क्र.१ ते ३ असे कळवितात की, प्रतिवादी क्र.१ ते ३ वाद मिळकतीच्या अनुषंगाने महत्वाची कागदपत्रे व आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध न झालेने वेळेत कैफियत देता आली नाही. त्यामुळे या प्रतिवादीस कैफियत देणेकामी पाच महिन्याचा विलंब झालेला आहे. त्यानंतर आवश्यक ती कागदपत्रे व माहिती त्यांचे वकिलांना दिल्यानंतर दाव्यास कैफियत तयार केली आहे. सदरील कैफीयत आज रोजी दाखल करीत आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कुठल्याही प्रकारचा हलगर्जीपणा अगर निष्काळजीपणा जाणून बुजुन केलेला नव्हता व नाही. तरी प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येवून कैफीयत देणेकामी झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविणारा खुलासा नि. ४० अन्वये वादी यांनी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार प्रस्तुतचा अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादीने कैफीयत दाखल करणेस झालेल्या विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. दोन्ही पक्षकारांचे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे अभिलेख पाहिले असता असे दिसून येते की, या अर्जाचा न्यायतत्वावर निकाल करण्यासाठी प्रतिवादीचे म्हणणे याकामी येणे आवश्यक आहे. आपल्या अर्जातून प्रतिवादी १ ते ३ आवश्यक ती माहिती वेळेत उपलब्ध न झालयाचे कळविले आहे तर वादींच्या कथनानुसार प्रतिवादींनी जाणून बुजून विलंब केलेला असून वादीस त्याचे मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात वादीने तूर्तातूर्त

अर्ज दाखल केलेला असून त्याची तातडीने चौकशी होणे वादीच्या कथनांवरून दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात अर्जाचा निर्णय न्यायतत्वावर होण्यासाठी प्रतिवादींची कैफियत स्वीकारणे गरजेचे आहे. तरी पुढील आदेश.

## आदेश

प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना ₹ तीनशे परिव्यय लादून अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

SARIKA SANDEEP PAKHALE
Digitally signed by SARIKA SANDEEP PAKHALE
Date: 2025.01.16 17:50:30 +0530

( श्रीमती एस. एस. पाखले )

दिनांक १६/०१/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

## **C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Khan A. I. (Grade-II) |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Pandharpur |
| judgment/order declared on | : | 16/01/2025 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 16/01/2025 |
| Order uploaded on | : | 16/01/2025 |